Open Access

उदयगिरी - बहुभाषिक इतिहास संशोधन पत्रिका

(A Bimonthly, Refereed, & Peer Reviewed Journal of History)
Published by: AAASSHER, Mumbai, (MS) India
Journal homepage: https://udayagiri.aaassher.org/
ISSN (Online): 2583-8423
Volume 1, Issue 4, October 2023; Pages 280 – 285
DOI: 10.5281/zenodo.10122019

Original Research Article

# हिंद स्वराज्य आणि महात्मा गांधी

प्रा. डॉ. सुभाष रा. रगडे

इतिहास विभाग, पदवी, पदव्युत्तर व संशोधन केंद्र, श्री शिवाजी कॉलेज, कंधार जि. नांदेड ४३१७१४ महाराष्ट्र, भारत

*Corresponding author E-mail*: subhashragade@gmail.com

Received: 15 October, 2023 | Accepted: 26 October, 2023 | Published: 27 October, 2023

**प्रस्तावना**

भारताच्या स्वातंत्र्य संग्रामातील प्रमुख नेते व तत्वज्ञ महात्मा गांधी हे होते. त्यांनी अहिंसात्मक, असहकार आंदोलनाने भारताला स्वातंत्र्य मिळवून दिले. शतकानुशतके दडपल्या गेलेल्या भारतीयांना निर्भय बनविले. त्यांच्यातील नैतिक शक्ती व आत्मविश्वास जागृत करून ब्रिटीश अधिसत्तेविरुध्द् लढयाकरिता तकटीबध्द् केले. राष्ट्राच्या स्वातंत्र्य लढ्याचे नेतृत्व यशस्वी पणे करणारे, केवळ भारतालाच नव्हे तर हिंसाचार, विध्वस, विनाश यामुळे भयग्रस्त झालेल्या जगाला सत्य, अहिंसा व शांती याचा मौलिक संदेश देऊन मानवी कल्याणाचा मार्ग दाखविणारे महान राजकीय संत म्हणून भारताच्या इतिहासात महात्मा गांधी यांचे नाव अजरामर झालेले आहे. त्यांचे व्यक्तिमत्व हे बहुआयामी होते. त्यांनी आपल्या आयुष्यातील ५५ वर्षे भारताच्या सेवेत घालवली. सन १९२० ते १९४७ हा भारतीय स्वातंत्र्य चळवळीच्या कालखंडास गांधीयुग या नावाने ओळखले जाते. ब्रिटीश राजवटीत भारताची अस्मिता धुळीस मिळाली होती. भारताचा स्वाभिमान व चैतन्य हरवले होते. अशा परिस्थितीत त्यांनी भारताचे उज्वल भविष्य घडविण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले. तत्त्वचिंतक, वैज्ञानिक, अभ्यासक, संशोधक, कार्यकर्ते पुन्हा पुन्हा गांधींच्या विचारांचे मंथन करीत आहेत.

एक लाखापेक्षा अधिक पुस्तके गांधींवर लिहिली गेली आहेत. आजही लिहिली जात आहेत. महात्मा गांधींनी विपुल लेखन केले आहे. अनेक दशके त्यांनी बऱ्याच वर्तमानपत्रांचे संपादन केले. यामध्ये गुजराती, हिंदी आणि इंग्रजी मधील हरिजन, दक्षिण आफ्रिकेमध्ये असतांना इंडियन ओपिनियन आणि भारतात परत आल्यावर इंग्रजी मधील यंग इंडिया, गुजराती मासिक नवजीवन यांचा समावेश आहे. नंतर नवजीवन हिंदीमधून पण प्रकाशित केले गेले. गांधींनी काही पुस्तके सुद्धा लिहिली आहेत. त्यांचे आत्मचरित्र-माझे सत्याचे प्रयोग या नावाखाली प्रकाशित झाले आहे. त्यांच्या दक्षिण आफ्रिकेतील संघर्षावर त्यांनी "Satyagraha in South Africa (दक्षिण आफ्रिकेतील सत्याग्रह)" हे पुस्तक लिहिले आहे.

तसेच त्यांनी "हिंद स्वराज" किंवा "Indian Home Rule" ही राजकीय पुस्तिका लिहिली आहे. जॉन रस्किनच्या "Unto This Last" चे गुजराती भाषांतर केले आहे. हा शेवटचा लेख त्यांच्या अर्थशास्त्रावरील विचारसरणीचे वर्णन करतो. त्यांनी शाकाहार, आहार आणि स्वास्थ्य, धर्म, सामाजिक परिवर्तन इत्यादी विषयावर सुद्धा विपुल लेखन केले आहे. ते सामान्यतः गुजरातीमध्ये लिखाण करीत. पण त्यांच्या पुस्तकांच्या हिंदी आणि इंग्रजी भाषांतरांचे परीक्षणसुद्धा ते करत असत. गांधींचे पूर्ण लेखन भारत सरकारने "संकलित महात्मा गांधी" (The Collected Works of Mahatma Gandhi) या नावाखाली १९६० च्या दशकात प्रकाशित केले आहे. यामध्ये जवळपास १०० खंड व त्यांची ५०,००० पृष्ठ संख्या आहे. इ.स.१९०८-०९ चे गांधींचे ‘हिंदस्वराज्य’ हे पुस्तक भारतीय राज्यकारणाच्या चर्चा विश्वातले हे अत्यंत महत्त्वाचे पुस्तक मानले जाते.

इ.स.१९०९ मध्ये ‘हिंद स्वराज्य’ हे म. गांधींनी मूळ गुजरातीत लिहिलेले चिंतनात्मक पुस्तक आहे. त्याचा ‘इंडियन होम रूल’ हा इंग्रजी अनुवाद स्वत: गांधींनी १९१० मध्ये केला होता. मात्र या गुजराती व इंग्रजी आवृत्तींमधून दिसणारे गांधी हे वेगळे भासतात. मूळ गुजराती शीर्षकात ‘स्वराज्य’ शब्द वापरला असला, तरी गांधींनी जाणीवपूर्वक इंग्रजी आवृत्त्यांमध्ये ‘स्वराज’ शब्द वापरला आहे. ‘हिंद स्वराज’ चे मूळ लेखन गांधींनी १३ ते २२ नोव्हेंबर १९०९ मध्ये दरम्यान इंग्लंडहून दक्षिण आफ्रिकेला येणाऱ्या ‘किल्डोनन कासल’ या आगबोटीवर गुजराती भाषेत केले. डिसेंबर १९०९ मध्ये ‘इंडियन ओपिनियन’ च्या दोन अंकांत प्रसिद्ध झाले. इ.स.१९१० च्या जानेवारीत पुस्तकाची पहिली आवृत्ती दक्षिण आफ्रिकेतून इंटरनॅशनल प्रेस तर्फे प्रसिद्ध झाली होती. हिंद स्वराज हे पुस्तक खूप छोटे आहे. त्यात फक्त ८० पाने आहेत. या पुस्तकाच्या प्रस्तावनेला 'ए वर्ड ऑफ एक्सप्लानेशन' असे नाव दिले आहे. भारतातील मुंबई इलाख्याच्या शासनाने १३ मार्च १९१० मध्ये या पुस्तकाच्या प्रती जप्त केल्या. त्यामुळेच गांधींनी स्वत: पुस्तकाचा इंग्रजी अनुवाद घाई-घाईत २० मार्च १९१० रोजी प्रसिद्ध केला. म. गांधी भारतात परत आल्यावर हे इंग्रजी पुस्तक इ.स. १९१९ मध्ये भारतात प्रथम प्रसिद्ध झाले. किंबहुना या बंदी घातल्या गेलेल्या पुस्तकाचे प्रकाशन आणि विक्री हा गांधींच्या ‘सविनय प्रतिकारा’ चा भाग होता. इ.स. १९२१ मध्ये गांधींनी ‘यंग इंडिया’ पत्रिकेचे संपादकीय लिहिताना या पुस्तकाला ‘हिंद स्वराज ऑर इंडियन होम रूल’ असे नाव दिले. इ.स.१९२१ मध्ये त्याच्या इतर आवृत्त्या प्रसिद्ध झाल्या. इ.स.१९२४ मध्ये ते अमेरिकेतून ‘सर्मन ऑन द सी’ या नावाने हरिदास मजुमदार यांनी प्रसिद्ध केले. या पुस्तकाची सुधारलेली आवृत्ती इ.स.१९३८ साली प्रसिद्ध झाली. त्याच वर्षी बदललेल्या राजकीय परिस्थितीत या पुस्तकावरील भारतात बंदी उठवण्यात आली. महात्मा गांधीजींचे स्वराज्य पर्यायी सभ्यतेचे धर्मग्रंथ किंवा ब्लू प्रिंट आहे. राज्यसत्ता मिळविण्याचा राजकीय अजेंडा किंवा जाहीरनामा नाही.

महात्मा गांधींनी इंग्रजी अनुवाद अनेक ज्येष्ठांना पाठवून त्यांची मते मागवली होती. रशियात लिओ टॉलस्टॉय यांनी ते वाचून ८ मे १९१० रोजी गांधींना पत्रात लिहिले होते की, “तुम्ही ज्या सविनय प्रतिकारासंबंधी लिहीत आहात, ते प्रश्न फक्त भारताच्या दृष्टीने नव्हे, तर एकूणच सर्व मानवजातीला अत्यंत महत्त्वपूर्ण आहेत !” या अनुवादाची टंकलिखित प्रत गोपाळ कृष्ण गोखले यांच्याकडे हेन्री पोलाक यांच्यामार्फत पाठवण्यात आली होती. गोपाळ कृष्ण गोखले यांनी या पुस्तकाचे विश्लेषण नापसंत केले होते. त्यांनी गांधीजींना ‘कच्चा’ म्हटले होते. त्यांना वाटतं होते की, भारतात परतल्यानंतर गांधीजी स्वतः हे पुस्तक रद्द करतील. पण तसे झाले नाही. हिंद स्वराज चे हिंदी आणि संस्कृत यांच्या सह अनेक भाषांमध्ये अनुवाद झाले आहेत. संस्कृत भाषांतर डॉ. प्रवीण पंड्या यांनी केले. हिंद स्वराज्यात सखोल सभ्यतावादी चर्चा आहे.

या पुस्तिकेत वीस प्रकरणे आणि दोन परिशिष्टे आहेत. संवाद शैलीत लिहिलेल्या या पुस्तकात अनेक ठिकाणी नाटक आणि थरार पाहायला मिळतो. पहिल्याच प्रकरणात, 'थांबा, तू खूप दूर गेला आहेस,' 'तू अधीर झाला आहेस,' 'मी अधीरता सहन करू शकत नाही', 'तुला गोलगोल उत्तरे देऊन माझ्या प्रश्नांना उडवून लावायचे आहे,' अशी वाक्ये येतात. संवाद अतिशय मनोरंजक आहेत. ही संवाद शैली भारतीय धर्म आणि तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रात फार प्राचीन काळापासून आहे.

या पुस्तकात महात्मा गांधींनी स्वराज्याची अतिशय चांगल्या पद्धतीने आणि सोप्या भाषेत व्याख्या करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांच्या मते, स्वराज ही एक अतिशय सोपी संकल्पना आहे. ते म्हणतात की, स्वराज ही अशी शासन व्यवस्था आहे ज्यामध्ये इंग्रजांची भूमिका नाही, ज्यामध्ये इंग्रजांचा कोणताही तालुका नाही, त्याला सोप्या भाषेत हिंद स्वराज म्हणतात. गांधीजी म्हणतात की, जर आपण स्वतःवर नियंत्रण ठेवले व चांगल्या पद्धतीने कारभार करायला सुरुवात केलीतर आपल्यासाठी खूप मोठी उपलब्धी असेल. ब्रिटीश राजवट नाकारून ती समूळ उखडून टाकण्यासाठी स्वराज्यावर विश्वास ठेवणाऱ्या सर्वांनी एकत्र यावे. तेव्हाच आपला वैयक्तिक आणि सामुदायिक पातळीवर विकास होऊ शकेल. ही एक अशी व्यवस्था असेल ज्यामध्ये प्रत्येकाला त्यांचे ध्येय साध्य करण्यासाठी आणि स्वतःचा विकास करण्याची संधी मिळेल.

हिंदी स्वराज्य ही गांधी विचारांच्या केंद्रस्थानी असलेली पुस्तिका आहे. यात आधुनिक भारताचा विकास कसा झाला पाहिजे ? याची रूपरेखा सादर केली आहे. आर्थिक साम्राज्यवादाला शह द्यावयाचा असेल तर छोट्या उद्योग, व्यवसायांना प्रोत्साहन देऊन खेड्यांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी करणे गरजेचे आहे. कमीत-कमी शोषण व्हावे आणि माणसा-माणसांतील संबंध अधिक विवेकपूर्ण, मानवीय करायचे असतील तर चंगळवाद आणि तंत्र-यंत्राचा विरोध करून मानवी श्रमाची प्रतिष्ठा करणे आवश्यक कसे आहे, हे गांधीजी पटवून देतात. आर्थिक साम्राज्यवादामुळे मानवी जीवन विस्कळीत होत चाललेले आहे. माणूस हा अविवेकी आणि संवेदनशून्य कसा होत चालेला आहे. याची जाणीव जगातील संवेदनशील मंडळीना अलीकडे अधिक तीव्रतेने होऊ लागलेली आहे. त्यामुळेच 'हिंद स्वराज्य' मध्ये व्यक्त झालेल्या विचारांवर पुन्हा एकदा नव्याने विचार विनिमय सुरू झालेला दिसून येतो.

भारतीय इतिहासाची इंग्रजांनी केलेली मांडणी म. गांधी नाकारतात. इंग्रजांनी या देशातील हिंदू सुशिक्षितांमध्ये मुसलमानांबद्दल चीड निर्माण व्हावी व सुशिक्षित मुसलमानांच्या मनात हिंदूबद्दल संशय निर्माण व्हावा अशा इतिहासाची मांडणी केली. हाच इतिहास त्यावेळी हायस्कूल ते कॉलेजपर्यंत शिकवण्यात येत होता. त्यासोबत काही जर्मन व इंग्रज अभ्यासक, इतिहासकारांनी प्राचीन भारतीय इतिहासाचे गौरवीकरण केले होते. त्या गौरविकरणास महात्मा गांधी नाकारतात. मानवी इतिहासाकडे पाहतांना गांधी क्रूर, रानटी आदिम, भटक्या जमाती आणि हिंसा यापासून क्रमश: मुक्त होत मानवी इतिहास सहकार्य, परस्परपूरकता आणि अहिंसा यावर आधारित ग्रामीण कृषिप्रधान जीवनापर्यंत कसा प्रगत होत गेला हे सांगतात. मानवी प्रगतीचा हा प्रवास हिंसेपासून अहिंसेकडे झालेला आहे, असे त्यांचे मत होते.

म. गांधी यांच्या मते, इतिहास हा मानवी जीवनाचा असतो. त्यामुळे ते भारताच्या सुवर्णयुगाची कल्पना नाकारतात. प्राचीन भारतीय सुवर्णयुग होते आणि तेव्हा सर्व काही पूर्णत्वास पोहोचले होते, असे म्हणणे म्हणजे प्राचीन काळापासून माणूस पूर्णत्वास पोहोचलेला होता, त्यामुळे त्याची बुद्धी आणि विवेक विकसित करण्याचा प्रश्नच नव्हता असे म्हणण्यासारखे होते. म्हणून म.गांधी सुवर्णयुगाची कल्पना नाकारतात आणि माणसाच्या अपूर्णत्वाकडे आपले लक्ष

वेधतात. त्यांच्या मते, इतिहास म्हणजे केवळ राज्यकर्त्यांचा सत्ता संघर्ष, माणसांचे स्वार्थ आणि चुका याचे वर्णन नसते. मानवी इतिहासातून विवेक, आत्मज्ञान, शांती, प्रेम, सहकार्य हे कसे उत्क्रांत होत गेले. याचे ज्ञान अवगत होत असते.

'हिंद स्वराज्य' मधून म. गांधी यांनी ब्रिटिश राजवटीचे ध्येय कसे आहे, यावर चर्चा केली आहे. परिवहनाची आधुनिक साधने ही शोषणाची साधने आहेत. अधिक चांगली घरे, उत्तमोत्तम कपडे ही चंगळवादाची साधने तथाकथित विकासाच्या माध्यमातून साम्राज्यशाही रुजवत आहेत. त्यामुळे भारताचे दारिद्र्य जास्त वाढत आहे. हे म. गांधींनी इ.स.१९०९ मध्ये लिहिले होते. 'हिंद स्वराज्य' मध्ये आधुनिक सभ्यतेवर टीका करण्यात आलेली आहे, त्याच्या मुळात साम्राज्यवादाच्या शोषणाचे स्वरूप स्पष्ट करणे आहे. हिंद स्वराज्यमधून गांधीजींनी वेगवेगळया प्रकारे सूचित केले आहे की 'आक्रमकांना भारत बळकाविणे सुलभ झाले कारण की, भारतीय लोकांमध्ये भित्रेपणा बोकाळलेला होता. ते भीतीने पछाडलेले होते आणि दैववादी बनलेले होते.' गांधींच्या मते, भारत इंग्रजांनी घेतला नाही. आपण भारत स्वतः इंग्रजांना दिला आहे.

गांधीजी म्हणतात की, प्रत्येक धर्माचे अंतिम ध्येय एकच आहे. परंतु तेथे पोहोचण्यासाठी वेगवेगळया धर्मांचे मार्ग वेगळे आहेत. सर्व धर्मांचे ध्येय एकच आहे. सर्व धर्म हे ईश्वराकडे नेण्याचे मार्ग आहेत, असा त्यांचा विश्वास होता. बहुतेक लोक महात्मा गांधींना हिंदू-मुस्लिम ऐक्याचे शिक्षक मानतात. त्यांनी धर्माला भारतीय राष्ट्रवादाशी जोडण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांनी सांगितलेल्या धर्माच्या मार्गावर सर्वांनी प्रयत्न केले तर राष्ट्रवादाला आणखी चालना मिळेल. हिंदू-मुस्लिम एकत्र काम केल्यास देशाची प्रगती होईल, असे हिंद स्वराज पुस्तकात स्पष्टपणे त्यांनी नमूद केले आहे. आजच्या तरुण पिढीने चुकीच्या मार्गावर जाऊ नये म्हणून या पुस्तकाचा आवश्य वाचावे. अगदी लहान खेड्यांमध्येही लोकशाही पोहोचली पाहिजे, असा गांधीजींचा नेहमीच आग्रह होता. तो अंतिम गावोगावी नेला नाही तर लोकशाहीचा तो मोठा पराभव ठरेल. आज संपूर्ण देशातील सर्व गावागावात लोकशाही पोहोचली आढळून येते.

या पुस्तकात गांधीजींची भारतीय पारंपरिक विचारसरणी आणि आधुनिक विचारसरणी या दोन्ही गोष्टी पाहायला मिळतात. दोन विचारांचे मिश्रण या पुस्तकात पाहायला मिळते. त्यांच्या मते, केवळ भारतीय लोकच देश चांगल्या प्रकारे चालवू शकतात आणि देशाचा विकास करू शकतात. या पुस्तकात गांधीजींच्या भारतीय आणि पाश्चात्य विचारसरणीची प्रतिबिंब पाहायला मिळते.

महात्मा गांधींनी 'हिंद स्वराज' या पुस्तकात नमूद करतात की, लंडनमध्ये असताना त्यांना काही भारतीय क्रांतिकारक भेटले. ज्यांची विचारसरणी अत्यंत धोकादायक आणि आक्रमक होती. त्या क्रांतिकारकांचा स्वातंत्र्याबाबतचा निर्भयपणा आणि जिद्द पाहून ते खूप प्रभावित झाले होते. परंतु गांधीजींना असे वाटले की, ते सर्व क्रांतिकारक पूर्णपणे दिशाहीन आहेत. कारण त्यांना फक्त हिंसेतून स्वातंत्र्य मिळवायचे होते. नेत्यांना मारणे, स्वातंत्र्य मिळवण्यासाठी धोकादायक बॉम्ब वापरणे हे सर्व त्यांचे मार्ग होते. मात्र गांधीजी या सर्व मार्गांना उघडपणे विरोध करताना दिसतात. गांधीजींच्या मते, केवळ इंग्रजांची सत्ता गेली तरी साम्राज्यवादी आक्रमण संपुष्टात येणार नाही. कारण इंग्रजांपासून स्वातंत्र्य मिळविल्यानंतर त्यांनी निर्माण केलेल्या नव्या व्यवस्थेमुळे भारताचे होणारे आर्थिक शोषण नष्ट करणे आवश्यक आहे. तसेच ब्रिटिशांनी जे वैचारिक आणि सांस्कृतिक वर्चस्व आणलेले आहे, त्याचा ही सामना करणे गरजेचे आहे. इंग्रजांची सत्ता केवळ लष्कराच्या आधारे उभी राहिलेली नसून त्यांच्या राजकीय सत्तेचा आधार आर्थिक होता. या सर्व घटकांचा विचार क्रांतिकारक करीत नव्हते. वसाहतवादाचे व्यामिश्र स्वरूप आणि त्याची चौफेर पसरलेली मुळे यांचा सर्वांगीण विचार न करता केवळ इंग्रजांना हाकलून देण्याचा विचार क्रांतिकारक करीत होते. गांधीजींच्या मते, हिंसेच्या

मार्गाने जाऊन स्वातंत्र्य मिळणार नाही. जरी ते मिळाले तरी त्याचा फायदा सामान्य लोकांना होणार नाही. महात्मा गांधी दक्षिण आफ्रिकेत राहत असताना त्यांनी अहिंसेचा मार्ग अवलंबिला होता. अहिंसेनेच आपल्याला स्वातंत्र्य मिळू शकते यावर त्यांचा पूर्ण विश्वास होता. हिंसेची जागा आत्मत्यागाने घेतली पाहिजे, अशी त्यांची इच्छा होती.

'हिंद स्वराज' या पुस्तकात गांधीजींनी अहिंसा, नैतिकता, स्वदेशी, स्वावलंबन, समता आणि सभ्यताविषयक चर्चा या विषयावर आपले विचार मांडले आहेत. त्यांनी यांत्रिक सभ्यतेवर टीका केली आणि पाश्चात्य देशांचा विकास नाकारला. उपनिवेशवाद, साम्राज्यवाद, औद्योगिक भांडवलवाद आणि भौतिकवाद यावर ठळकपणे आपले मत व्यक्त केले होते. शेवटी गांधीजी वाचकांना सांगतात की, १) तुमच्या मनाचे राज्य स्वराज्य आहे, २) तुमची गुरुकिल्ली आहे सत्याग्रह, आत्मविश्वास किंवा करुणा शक्ती, ३) ती शक्ती वापरण्यासाठी स्वदेशी पूर्णपणे स्वीकारली पाहिजे, ४) आम्हाला काय करायचे आहे. इंग्रजांना शिक्षा करण्यासाठी नाही तर ते करणे आपले कर्तव्य आहे म्हणून करा.

संवाद शैलीत लिहिलेल्या या पुस्तकात अनेक ठिकाणी नाटक आणि थरार पाहायला मिळतो. पहिल्याच प्रकरणात, 'थांबा, तू खूप दूर गेला आहेस,' 'तू अधीर झाला आहेस,' 'मी अधीरता सहन करू शकत नाही', 'तुला गोलगोल उत्तरे देऊन माझ्या प्रश्नांना उडवून लावायचे आहे,' अशी वाक्ये येतात. संवाद अतिशय मनोरंजक आहेत. ही संवाद शैली भारतीय धर्म आणि तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रात फार प्राचीन काळापासून आहे.

**समारोप**

२० व्या हे शतकातील एक महान व्यक्तिमत्त्व म्हणजे महात्मा गांधी होय. अहिंसात्मक व सत्याग्रही प्रतिकाराचा मार्ग जगाला दाखवणारे व त्यावर अमंलबजावणी करणारे एक युगपुरुष. म .गांधी यांच्या 'हिंद स्वराज्य' या पुस्तकाने भारतीय स्वातंत्र्य चळवळीत उच्च स्थान देण्यात आलेले आहे. कारण हे पुस्तक वाचल्यानंतर लोकांना राष्ट्राचे महत्त्व समजू लागले. ते मिळविण्यासाठी भारतीय तयार झाले. इ.स.१९०९ पासून म .गांधी यांच्या 'हिंद स्वराज्य' ची प्रशंसा आणि टीका सुरू आहे. इ.स.१९३८ मध्ये मिल्टन मुरे यांनी 'अध्यात्मावरील अभिजात ग्रंथ' म्हणून या ग्रंथाचा गौरव केला होता. लॉर्ड लोथियन यांनी 'एकूण सर्व गांधी विचार हिंद स्वराज्य मधील तीस हजार शब्दांत सामावलेले आहेत', असे म्हटले आहे. म. गांधी यांना या पुस्तकातून देशाला केवळ स्वतंत्र करायचे नव्हते तर देशातील जनतेला नैतिकता आणि मूल्ये जपायला शिकवायचे होते. त्यांनी या पुस्तकात स्वराज्याचे ज्या प्रकारे वर्णन केले आहे ते अतिशय आदर्शवादी आहे. त्यात सर्वांचे कल्याण दडलेले आहे. या पुस्तकात व्यक्त केलेले हिंदू-मुस्लिम ऐक्याचे महत्त्व आजच्या काळात सर्वात जास्त गरजेचे आहे. आज देशात सर्वत्र जाती-धर्माच्या नावावर लोकांना वेगळे करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. त्यामुळे देशात अशांतता पसरली आहे. जाती-धर्माच्या नावाखाली लोकांची विभागणी केली जात आहे. आर्थिक साम्राज्यवादामुळे मानवी जीवन विस्कळीत होत चाललेले आहे. माणूस हा अविवेकी आणि संवेदनशून्य होत चालेला आहे. त्यामुळेच 'हिंद स्वराज्य' मध्ये व्यक्त झालेल्या विचारांवर पुन्हा एकदा नव्याने विचार सुरू करणे आवश्यक आहे. या पुस्तकाबाबत अनेकांनी त्यांच्यावर आधुनिक असल्याची टीका केली आहे. त्यामुळेच त्यांचे पुस्तक लोकांना आवडले नाही. पण त्यांचे पुस्तक आजच्या आधुनिक काळात अतिशय योग्य पुस्तक मानले जात आहेत. कारण आज जगाला अहिंसेची सर्वात जास्त गरज आहे. गांधीजींचे विचार भारतीय संस्कृतीशी पूर्णपणे निगडीत आहेत. पण ते पाश्चात्य शैलीत मांडण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. जागतिकीकरण, त्याने निर्माण केलेली परिस्थिती लक्षात घेता आजच्या आधुनिक भांडवली व टोकाच्या विषम समाजाचा तंत्रज्ञानाने कब्जा मिळवलेल्या समाजाचा पर्याय शोधताना 'गांधी विचार' अटळ ठरतो.

**संदर्भ सूची**

१. बेडकिहाळ किशोर, (संपा.), (२०१३), परिवर्तन विचार : चिंतन आणि चिकित्सा – वसंत पळशीकर ह्यांचे निवडक लेख, लोकवाङ्मय गृह प्रकाशन, मुंबई

२. पुंडे द. दि., (संपा.), (१९९५), गांधीवाद आणि आधुनिक मराठी साहित्य, प्रतिमा प्रकाशन, पुणे

३. नेमाडे भालचंद्र, (संपा.), (१९९९), साने गुरुजी पुनर्मूल्यांकन, साहित्य अकादेमी, नवी दिल्ली.

४. मोरे सदानंद, (२००७), लोकमान्य ते महात्मा, राजहंस प्रकाशन, पुणे

५. बेडहिकाळे किशोर (संपा.), (२०२२), गांधी : जीवन आणि कार्य, साधना प्रकाशन, पुणे.

६. बेन्नूर फकरूद्दीन, (२०१८), हिंद स्वराज्य : एक अन्वयार्थ, लोकवाङ्मय गृह प्रकाशन, मुंबई

७. गांधी मो. क., (२०००), हिंद स्वराज्य, साकेत प्रकाशन प्रा. लि., औरंगाबाद

८. शिखरे दा.न., महात्मा गांधी गौरव ग्रंथ, महाराष्ट्र गांधी स्मारक निधी, पुणे.

९. Pagar Amol, Kadam Arvind (Ed.), (2020), Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ), PEER REVIEWED & INDEXED JOURNAL, ISSN-2349-638x, Special Issue No.69, Impact Factor - 6.293,

१०. Sirswal Desh Raj (Ed.), (2019), Lakayata, Journal of Positive Philosophy, ISSN 2249-8389, Special Issue on 'The Philosophy of Mahatma Gandhi', Vol. X, No.02.

११. टाक ओमप्रकाश, (२००८), आधुनिक भारतीय चिंतन, राजस्थान हिन्दी ग्रंथ अकादमी, जयपूर.